
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'' -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित
पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव
• Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC • ISO मानांकन 9001:2015 •
ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस व सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

**• संपादक •**

**प्रा.(डॉ.)शिवकुमार सोनाळकर**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

**• अतिथी संपादक •**

**डॉ.मिलिंद हुजरे**

प्राचार्य, पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि.सांगली

**डॉ.तातोबा बदामे** **डॉ.शहाजी पाटील**

**• कार्यकारी संपादक •**

डॉ.नीला जोशी

**• संपादक मंडळ •**

प्रा.(डॉ.)नंदकुमार मोरे डॉ.गोमटेश्वर पाटील डॉ. तातोबा बदमे डॉ.दिनेश वाघुंबरे

**• सल्लागार समिती •**

डॉ. राजन गवस डॉ. प्रकाश कुंभार डॉ. डी. ए. देसाई डॉ. अनिल गवळी

**• प्रकाशक •**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११

**मुद्रक**

देशमाने ऑफसेट,

औद्योगिक वसाहत, पलूस, (जि. सांगली) ४१६ ३१०, मो. ९९७०७००७५८

**मूल्य: ₹ ३००**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी देशमाने ऑफसेट, औद्योगिक वसाहत, पलूस येथे छापून अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११ येथे प्रकाशित केली. या प्रत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

| | | |
|---|---|---|
| लोकनाट्य कलेचे बदलते स्वरूप : लोकनाट्य तमाशा | युवराज तानाजीराव खरात | १६१ |
| कोरकू आदिवासींचे विधीनाट्य : खाम | डॉ.धनंजय महादेव होनमाने | १६५ |
| लोकसाहित्य आणि ललित साहित्य यांचा अनुबंध | डॉ. उत्तम रामचंद्र जाधव | १६९ |
| स्त्रीमनाचे उत्कट आविष्कार: 'उखाणे ' | डॉ.मानसी जगताळे | १७३ |
| लोकसाहित्याचा मौखिक आविष्कार : लोकगीते | डॉ.कल्पना संभाजी धोंडीराम | १७७ |
| लोकपरंपरेतील लोककथागीतांचे स्वरूप विशेष | डॉ.अमर कांबळे | १८१ |
| लोककला संगीतभजन : बदलती आविष्कार रूपे | निवृत्ती दत्तू कार्वेकर | १८५ |
| आदिवासी लोकगीतांमधील स्त्रीचे दर्शन | केशव धोंडिबा टिपरसे | १८८ |
| कीर्तन परंपरेचे स्वरूप व सद्यस्थिती | भारती श्रीधर कोळेकर | १९१ |
| महाराष्ट्रातील आदिवासींची लोकनृत्ये: भवाडा आणिदंडार | प्रियांका अशोक कुंभार | १९४ |
| संत एकनाथांच्या भारुडातील लोकाविष्कार | सौ.शुभांगी तानाजी कुंभार | १९८ |
| हादगा गीतातील स्त्रीसंवेदना | डॉ. लता पांडुरंग मोरे | २०१ |
| महाराष्ट्रातील सण–उत्सव परंपरा–अध्यात्म व वैज्ञानिकता | लक्ष्मी पवार | २०४ |
| प्रयोगरूप लोककलांचा सृजनात्मक आविष्कार | डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | २०७ |
| गजीढोल: एक लोकाविष्कार | संतोष लोंढे | २११ |
| भारतीय व पाश्चात्य लोकसंस्कृतीच्या आविष्कार रूपांमधील अनुबंध | डॉ.स्नेहा सुयास प्रभु महांबरे | २१३ |
| जात्यावरच्या ओव्या–स्त्रीमनाचा भावनाविष्कार | डॉ.सविता अशोक माळी | २१८ |
| मराठी लोकनाट्याची परंपरा व अभिव्यक्तीचे वेगळेपण | प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे | २२२ |



ISSN No. 2319-6025

# कीर्तन परंपरेचे स्वरूप व सद्यस्थिती

**भारती श्रीधर कोळेकर**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना**

कीर्तन हा लोकसंस्कृतीचा एक खांब असून भारतीय समाजप्रबोधनाच्या संस्कृतीमधील महत्वपूर्ण आणि मध्यवर्ती संकल्पना आहे.
सुरूवातीस समाजजागृती, धर्मजागृती व आत्मजागृतीच्या हेतूने कीर्तनाच्या माध्यमातून संतांनी भक्तीचळवळ उभी केली. काळाच्या ओघात, विज्ञान, तंत्रज्ञान व जागतिकीकरण इ. मुळे कीर्तनपरंपरेत चांगल्या संधी निर्माण झाल्या तशा काही अपप्रवृत्तींचा शिरकावही झाला. त्यामुळे कीर्तनाच्या रूपाविष्कारातही बदल होत गेले.

**कीर्तनाचे प्रकार व स्वरूप**

भारतीय संदर्भ कोशात प्राचीन काळापासून अस्तित्वात असणारे कीर्तनाचे १) नामसंकीर्तन, २) लीला संकीर्तन, ३) गुणसंकीर्तन असे तीन प्रकार दिलेले आहेत. नामसंकीर्तनात प्रामुख्याने ईश्वर नामाचा अखंड जप करणे अभिप्रेत असते. लीलासंकीर्तनात ईश्वरी लीला सांगावयाच्या असतात. तर गुणसंकीर्तनात षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा ईश्वराचे वर्णन करावयाचे असते. तसेच या तीन प्रकारात अनुक्रमे भजन-कथन-गायन अशी वैशिष्ट्ये दिसून येतात.

**१. नारदीय कीर्तन**

नारदीय संप्रदायाच्या कीर्तनात पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग असतात. पूर्वरंगात नमन, निरूपणाचा अभंग व निरूपण तर उत्तररंगात पूर्वरंगातील निरूपणाच्या अभंगासाठी उदाहरणादाखल एखादे आख्यान सांगितले जाते. पूर्वरंगात निळोबांचा अपवाद वगळता ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकारामांचाच अभंग लावण्याचा संकेत आहे. **२. वारकरी कीर्तन**

ज्ञानेश्वरीत कीर्तनाचा उल्लेख आला असला तरी नामदेवांना त्यांनी केलेल्या कीर्तनाच्या प्रसार व प्रचारामुळे नामदेवांना कीर्तनाचे प्रवर्तक म्हणून संबोधले जाते. त्यांनी रूढ केलेली कीर्तनपरंपरा म्हणजे वारकरी कीर्तन अथवा भजनी कीर्तन होय. यात आख्यानाला दुय्यम स्थान असते तर निरूपण व भजन हे मुख्य तत्व असते. या कीर्तनपरंपरेत भजनावर अधिक भर असतो.

**३. हरिदासी कीर्तन**

हरिदासी कीर्तनात लोकरंजनाशी आध्यात्मज्ञानाची सांगड घातली जाते. यात आख्याने, संतचरित्रे, भक्तचरित्रे, व्रतकथा, पुराणकथा इ. चा उपयोग हरिदास करतात. या प्रकारच्या कीर्तनातून कथेचा नाट्यात्म आविष्कार घडविला जातो. हरिदासाच्या गायन व अभिनय कौशल्यावर हे कीर्तन रंगत असते. यात प्रामुख्याने टाळ, चिपळ्या, तबला इ. वाद्ये वापरली जातात ही कीर्तन परंपरा १६ व्या शतकापासून विकसित झाली.

### ४. राष्ट्रीय कीर्तन

शिवजयंती, गणेशोत्सवाच्या निमित्ताने सर्व समाज एका पातळीवर आणण्याचे कार्य फक्त 'राष्ट्रीय कीर्तनकारच' आणू शकेल या हेतूने टिळकांनी 'राष्ट्रीय कीर्तन' ही संकल्पना मांडली. डॉ. दत्तोपंत पटवर्धनबुवा हे राष्ट्रीय कीर्तनाचे आद्य प्रवर्तक होत.

राष्ट्रीय कीर्तनात ऐतिहासिक चरित्रनायक हा ईश्वरी अंश मानला जातो. प्रामुख्याने ऐतिहासिक व राष्ट्रीय चळवळीत भाग घेतलेल्या, नेत्यांच्यावर आधारित आख्याने रचली जातात. या आख्यानात असामान्य कर्तृत्वाच्या किंवा देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणा-यांचा गौरव केलेला असतो. त्यामुळेच ''स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या कोणाही ऐतिहासिक वा राष्ट्रीय महापुरूषाच्या चरित्रकार्याचे विवेचन ज्या आख्यानात बुवा करतात ते 'राष्ट्रीय कीर्तन' होय. २

### ५. रामदासी कीर्तन

या कीर्तनप्रकारात पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग असून कीर्तनात चिपळ्या, झांज, सूरपेटी या वाद्यांचा वापर केला जातो. नमनासाठी समर्थांची प्रार्थना आणि निरूपणासाठी रामदासांचाच अभंग म्हटला जातो. संगीताला मात्र यात विशेष स्थान नाही. या कीर्तनात बहुतांशी रामनाम व रामभक्तीचे माहात्म्य वर्णिलेले असते. परंतु या कीर्तनप्रकाराचे वेगळेपण म्हणजे कीर्तनकार उत्तररंग संपल्यानंतर समर्थांच्या जीवनातील छोटासा प्रसंग सांगतात की हा विशेष इतर कोणत्याही संप्रदायात नाही.

या सर्व कीर्तनप्रकाराबरोबरच गाडगेमहाराज, कैकाडी महाराज, तनपुरे महाराज, तुकडोजी महाराज इ. संतांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याचे कार्य केले.

कीर्तन प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी कीर्तनकाराजवळ काही कौशल्ये असणे गरजेचे असते. ती पुढीलप्रमाणे -

### कीर्तन आविष्कारासाठी आवश्यक कौशल्ये/घटक

''शब्दरचना, वाक्यरचना व वाक्चातुर्याने शोभविलेले नव्या नव्या अर्थाच्या कवितांनी युक्त असलेले, गाण्याच्या तानांनी वाढविलेले-नटविलेले, भगवल्लीलेने शोभवलेले जे असेल, ज्यात साधुसंतांचे एखादे उपदेशपर पद असून ते प्रमाणभूत घेऊन त्यावर उपसंहार केला असेल ते हरिकीर्तन श्रेष्ठ ठरते.'' ३

#### १. वक्तृत्व

हा कीर्तनातील अत्यावश्यक घटक असून वक्तृत्वाने कीर्तनात सजीवता येते. सोप्या भाषेत उपमालंकारांनीयुक्त, दृष्टान्त, सुभाषिते, म्हणी इ.नी दाखले दिल्याने श्रोत्यांना वेदान्त विवेचन पटते. प्रतिपाद्य विषयाच्या मांडणीला सूक्ष्म गती मिळते. यात रसाळ अभिव्यक्ती व सूचक संदर्भांना प्राधान्य असते. शब्दांची नेमकी जाण, ओराह-अवरोह, योग्य व अचूक शब्दांचा वापर इ. घटकांमुळे रसपरिपोष होण्यास मदत होते, म्हणूनच 'शब्द अचूक योजून ससंदर्भ तर्कशुध्द वाक्यांची सूत्र मालिका मुद्देसूदपणे मांडणे यास वक्तृत्व म्हणतात.' ४


ISSN No. 2319-6025

२. संगीत व गायन

शब्दांपेक्षा स्वरांचे सामर्थ्य अधिक असते त्यामुळे स्वरांमधील भाव मनाशी लवकर जुळतात. भावनापरिपोषासही संगीताचे योगदान मोठे असते. आख्यानातील उत्कट प्रसंगवर्णनासाठी, निवेदनास पूरक संगीत योजल्यास कीर्तन परिणामकारक होते. एखाद्या पदाच्या आधारे आख्यानास व निरूपणास उठाव देण्याचे कौशल्य कीर्तनकाराजवळ असावे लागते. संगीतविरहीत कीर्तनास पुराण म्हणतात. परंतु कीर्तन म्हणजे संगीताची मैफल नसून त्यात प्रसंगोचित गायन अभिप्रेत असते.

३. नाट्य, अभिनय, संवाद, विनोद

कीर्तनात नाट्य आवश्यक असते. वाचिक अभिनयास येथे अधिक वाव असतो. निवेदनास नाट्याची जोड असावी. कीर्तनास अष्टसात्विक भाव निर्माण होण्यासाठी नृत्यही असते. अभिनयाच्या सा-या अंगाचा समावेश कीर्तनात होतो. उदा. मुद्राभिनय, हातवारे, टुणकन् उडी मारणे, गुडघ्यात व कमरेत हळूच वाकणे, डोळे पुसणे इ. कीर्तनातील श्रोता हा संमिश्र असल्याने संवाद बोलीभाषेमधून अधिक प्रभावी ठरतात.

**कीर्तनाचे बदलते स्वरूप व सद्यस्थिती**

पूर्वीच्या काळात कीर्तनात ईश्वरभक्ती, नामसंकीर्तन व संतसंगतीचे माहात्म्य हे विषय प्राधानाने दिसून येतात. नंतरच्या काळात तुकारामांनी यात बंड करून कीर्तनाच्या अभंगाच्या माध्यमातून आध्यात्मिक, उपदेशपर, विराणी, गवळणी, टीपरी इ. अभंगप्रकारांची निर्मिती करून कीर्तनाच्या माध्यमातून धर्मजागृती व आत्मजागृती करण्याचे कार्य केले.

एकूणच काळाच्या ओघात बदलत चाललेले कीर्तन आविष्काराचे स्वरूप पाहता त्यातील काही अपप्रवृत्ती वगळता यांचा प्रचार व प्रसार करणे, गाडगेबाबा, तुकडोजी महराजांच्या प्रबोधनाचा वारसा, बाबा महाराज सातारकरांची रसाळ वाणी, धुंडा महाराज देगलूरकरांची कथन निरूपण पध्दती इ. मुद्दे वाखाणण्यासारखे आहेत. ग्रामीण भागात आजही सांप्रदायिक कार्यक्रम व पारायणांमधून वारकरी संप्रदायिक कीर्तन परंपरा तितकीच तग धरून आहे.

एकूणच कीर्तन या संतपरंपरेतील लोककला प्रकाराने प्रारंभापासून आजतागायत बहुजन समाजमनावर गारूड केले आहे. त्याला कारण त्यातील संत विचार, नवोदित कीर्तनकारांची पारंपरिक आणि समकालीन आशयसंदर्भाची मांडणी. यामुळे हा लोककलाप्रकार सतत जिवंत, कालप्रवाही आणि समाजमन, समाजमाध्यमांना सोबत घेऊन जात असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. घुमरे दि. भा. (संपा.) कीर्तन-संकीर्तन , 'कीर्तन; एक संकल्पना', पृ. १३.
२. पाठक यशवंत. नाचू किर्तनाचे रंगी  कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृ. १९१.
३. भागवत वि. ग. कीर्तनाचार्यकम्, काशी, पृ. ६-८.
४. पाठक यशवंत, उ.नि. पृ. ११